राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी हिंदी भाषा
परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक हिंभाप-१०८१-३०५-वीस,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जून १९८२.

पहा :— १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप-१०६५-न,
दिनांक १ ऑक्टोबर १९६६.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप-१९७६-२८,
दिनांक १० जून १९७६.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप-१७८०-२८,
दिनांक १७ जुलै १९८०.

शासन निर्णय :— राजपत्रित व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या मराठी भाषा परीक्षा नियमानुसार ज्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची मातृभाषा मराठी आहे त्यांना निम्नस्तर व उच्चस्तर मराठी भाषा परीक्षेतून सूट देण्यात आलेली आहे. तथापि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप-१९७६-२८, दिनांक १० जून १९७६ अन्वये विहित करण्यात आलेल्या हिंदी भाषा परीक्षा नियमावलीतील हिन्दी मातृभाषा असलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना हिंदी उच्चस्तर व निम्नस्तर परीक्षेतून सूट देण्याची तरतूद नाही. त्या संदर्भात शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, ज्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची मातृभाषा हिंदी आहे त्यांना शासनाने विहित केलेल्या हिंदी भाषा परीक्षेतून सूट देण्यात यावी. मात्र मराठी मातृभाषा ठरविण्यासाठी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मभाप-१५७७-२८, दिनांक १० फेब्रुवारी १९७८ अन्वये ठरविण्यात आलेले निकष त्यासाठी लागू असतील.

Office of The Collector, Ratnagiri 28 JUL 1982 Branch Date

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप-१९६६-न, दिनांक १ ऑक्टोबर १९६६ अन्वये वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांना विहित हिंदी बोलीभाषा परीक्षेतून सूट दिलेली आहे. शासनाच्या विविध विभागांच्या अधिपत्याखालील अनेक तांत्रिक व बिगर तांत्रिक स्वरुपाच्या पदांसाठी विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार ज्या पदावरील नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण असण्याची गरज नाही अशी अनेक पदे (उदा. वाहन चालक, कातारी, जोडारी, वीजतंत्री, इत्यादी) सध्या वर्ग ३ मध्ये अंतर्भूत करण्यात आलेली आहेत अशा पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदांची कर्तव्ये पार पाडताना हिंदी भाषेच्या ज्ञानाची फारशी आवश्यकता भासत नाही. म्हणून वर्ग ३ मधील तांत्रिक व बिगर तांत्रिक स्वरुपाच्या ज्या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार त्या पदावरील नियुक्तीसाठी माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण असण्याची गरज नाही अशा पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विहित हिंदी भाषा परीक्षेतून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. हे आदेश दिनांक १ जुलै १९८१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. दा. रणदिवे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

कृ. मा. प.